भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०७/२०१७

**१) जनावरांच्या गोठयात असलेल्या गाईला कनकीचे गोळयात थिमेंट औषध देवुन गाईचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक ०२/०७/२०१७ ते ११.०० ते १२.०० वा. दर. यातील अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीच्या जनावरांचे गोठयात असलेल्या गाईला कनकीचे गोळयात थिमेंट हे विषारी औषध देवुन गाईचे मरणास कारणीभुत झाल्याने किंमती २०,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी मनोहर महादेव गिन्हेंपुजे वय ६५ वर्ष, रा. मौखारा यांचे तोंडी रिपोर्ट व चौकशी अहवालावरुन वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४२९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर चालवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/०७/२०१७ चे १४.३० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील एमएच ३६ झेड २३० बोलेरो वाहन ही आमरोडवर येणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अचानक प्रकृती बिघडल्याने तरुणाचा मृत्यु . :—**

दिनांक ०४/०७/२०१७ चे ००.१५ वा. दर. यातील मृतक शुभम मदन चव्हान वय २२ वर्ष, रा. इंदीरा नगर सावरी यांची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे नेले असता डॉक्टराने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरुन पो.स्टे. भंडारा येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. कुंभरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) तलावाचे पाण्यात तोल जावुन पाण्यात बुडुन मुलाचा मृत्यु. :—**

दिनांक ०३/०७/२०१७ चे १६.०० ते ०४/०७/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रमोद मनीराम जांबुळकर वय ४० वर्ष, रा. एकोडी याचा मृतक मुलगा सुंदाशु प्रमोद जांबुळकर वय १० वर्ष, रा. एकोडी हा तलावात फिरण्यास गेला असता तलावाचे पोटातील मुरुमाचे खंडयात तोल जावुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व ओपी एकोडी आकरन्स क्र. ११/१७ दिनाक ४/०७/२०१७ अन्वय पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

५) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ०२/०७/२०१७ चे २३.५० वा. दर. यातील मृतक बबन राजाराम गणवीर वय ५३ वर्ष, रा. टेंमणी हा ३ ते ४ वेळा संडास उलटी केल्याने त्यास डॉक्टरकडे आषधोपचारा केला परंतु प्रकृती बरी न झाल्याने त्यास सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती करुन तेथील डॉक्टरानी पुढील उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे रेफर केल्याने त्यास सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम जाफौ. चे कागदपत्र पो.स्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. पठाण यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. चिचखेडे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

६) सापाने चावा घेतल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ०२/०७/२०१७ चे ०२.३० वा. दर. यातील मृतक ओमप्रकाश गाजानन बानेवार वय ३० वर्ष, रा. चांदपुर हा घरी झोपला असता त्याचे उजवे हाताचे कोनीखाली सापाने चावा घेतल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे दिनांक ०२/०७/२०१७ चे ०६.०० वा. भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम जाफौ. चे कागदपत्र पो.स्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादीपोना. पठाण यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जटाळ पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०४/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४,तीन सिटर वाहनांवरती २३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.